**महाराष्ट्र शासन**

क्रमांक- वेतन-२०१९ / प्र.क्र.१२५ / सेवा-३
वित्त विभाग, तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १०.१२.२०१९

प्रति,

संचालक (लेखा व कोषागारे)
संचालक लेखा व कोषागारे यांचे कार्यालय,
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग,
बेलार्ड इस्टेट,
मुंबई - ४०० ००१.

**विषय :-** सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रदानाबाबत.......

**संदर्भ :-** आपले जा.क्र.:संलेको/कोषा/उपले/अप्रयो/२०१९/३०७/४२५५. दि.०१.११.२०१९ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुषंगाने अनुज्ञेय करावयाचे लाभ, हे दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन करता, ते भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्याबाबत कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. त्यामुळे सदर लाभाची रक्कम ही संबंधित कर्मचाऱ्यांना रोखीने एकरकमी द्यावयाची आहे.

२. तसेच नमूद करण्यात येते की, दि.१४.०५.२०१९ रोजीच्या वित्त विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केले आहे की, सदर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देतांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची प्रथम सातव्या वेतन आयोगाच्या मॅट्रीक्समध्ये वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे. ही वेतननिश्चिती केल्यानंतर दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीची रक्कम, शासन अधिसूचना वित्त विभाग दि.३०.०१.२०१९ मधील नियम क्रमांक १४ मध्ये विहीत केलेल्या अटींच्या अधीन राहून कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधित किंवा लागू असणाऱ्या निवृत्ती वेतन योजनेच्या खात्यामध्ये, जमा करणे अपेक्षित आहे. त्यांनतर संबंधितास पात्रतेनुसार दि.०१.०१.२०१६ रोजी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा अनुज्ञेय ठरणारा लाभ अदा करावयाचा आहे. त्यामुळे सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्या अनुषंगाने थकबाकीची रक्कम रोखीने एकरकमी अनुज्ञेय राहील. त्यामुळे वरील पार्श्वभूमीवर आपल्या



Scanned by CamScanner

संदर्भीय पत्रात व्यक्त केलेला संभ्रम दूर होत असल्याचे आपणास दिसून येईल. त्यामुळे शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील परिच्छेद क्रमांक viii व xvi मध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

**आपला,**

**(भा. ज. गाडेकर)**
**उप सचिव, वित्त विभाग**

Scanned by CamScanner